साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–शालीनी दविदात मेघरे,
वय:–५२ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.पिपरा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. घटनेची तारिख २७/०८/२०१८ अशी आहे. सदर घटनेच्या पुर्वी आरोपी देवराव शिवशंकर मेघरे याने रस्त्यावर बैलबंडी बांधत असल्यामुळे आम्ही ग्रामपंचायतला अर्ज केला होता. त्यानंतर चौकशीकामी ग्रामपंचायतचे लोक माझ्याकडे आले होते. त्यानंतर आम्ही त्यांना विचारले की, कशाची चौकशी आहे त्यावेळी ग्रामपंचायवचे लोक आम्हाला म्हणाले की, चौकशी तुमच्या अर्जाची नाही तर देवराव शिवशंकर मेघरे यांनी केलेल्या अर्जाची चौकशी आहे. त्यावेळी माझ्या पतीने ग्रामपंचायतच्या लोकांना विचारले की, तुम्ही देवराव शिवशंकर मेघरे यांच्या अर्जाची चौकशी लावली परंतु माझ्या अर्जाची चौकशी का लावली नाही. त्यावेळी शिवशंकर मेघरे हा आला व माझ्या पतीला म्हणाला की, 'आमच्या अर्जाची चौकशी आहे तुमच्या अर्जाची चौकशी नाही'.

२. त्यानंतर देवराव मेघरे हे आले व ते म्हणाले की, घ्या रे काड्या. त्यानंतर रामा मेघरे यांच्या घरातुन आरोपींनी काड्या काढल्या व माझ्या पतिला मारले. आरोपीतांपैकी शंकर मेघरे, देवराव मेघरे आणि रामा मेघरे यांनी माझ्या पतिला डोक्यावर मारले. माझ्या पतिला आरोपींनी लोखंडी सळाखीने व काडीने मारले त्यामुळे माझ्या पतिचे डोके फुटले. माझ्या पतिला लोभा मेघरे याने लोखंडी सळाखीने डोक्यावर मारले व सचिन मेघरे यांनीसुध्दा माझ्या पतिला लोखंडी सळाखीने मारले. तसेच माझा मुलगा अनिकेत देविदास मेघरे याला आरोपी देवराव मेघरे व रामा मेघरे यांनी हातबुक्कीने व काडीने मारले. त्यानंतर आरोपीं चंद्रकला मेघरे व कल्पना मेघरे यांनी माझे केस ओढले व बुक्क्यांनी मारहाण केली.

३. त्यानंतर ठाणेदार साहेब हे मोक्यावर आले. त्यानंतर मी पोलिसांना रिपोर्ट दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.३८** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.३९** देण्यात

आला. पोलिस स्टेशनला गेल्यावर पोलिसांनी माझे पति व मुलाला दवाखाण्यात नेले. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. ज्या आरोपींनी माझ्या पतिला व मुलाला मारहाण केली त्यांना पाहिल्यास मी ओळखते. त्यापैकी तीन आरोपी न्यायालयात हजर आहे व दोन आरोपी गैरहजर आहे. (आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज नि.क्र.३६ वर दाखल,मंजुर ओळखीबाबत तक्रार नाही). आरोपीने माझ्या पतिला व मुलाला ज्या काठीने व ज्या लोखंडी सळाखीने मारहाण केली ते दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला जी.पी.न.१९/२०२५ वरिल एक लाकडी काठी दाखविली ती तीच आहे त्याला **एम.ओ.०१** देण्यात आला. तसेच आता मला जी.पी.न.१९/२०२५ वरिल एक लोखंडी सळाख दाखविली ती तीच आहे त्याला **एम.ओ.०२** देण्यात आला. आता मला जी.पी.न.१९/२०२५ वरिल कपडे दाखविले त्यापैकी आता मला फिक्कट गुलाबी रंगाचा एक शर्ट दाखविण्यात आला तो माझ्या पतिचा शर्ट आहे. त्यावर रक्ताचे डाग आहे त्याला **एम.ओ.०३** देण्यात आला. आता मला एक पांढ–या रंगाची हाफ बनियान दाखविण्यात आली ती माझ्या पतिची बनियान आहे. त्यावर रक्ताचे डाग आहे त्याला **एम.ओ.०४** देण्यात आला. आता मला पांढ–या रंगाचा त्यावर काळे लहाण ठिपके असलेला शर्ट दाखविण्यात आला तो माझा मुलगा अनिकेत याचा शर्ट आहे. त्यावर रक्ताचे डाग आहे त्याला **एम.ओ.०५** देण्यात आला.

४. आता मला एक पांढ–या रंगाचा शर्ट दाखविण्यात आला तो आरोपी शंगर मेघरे याचा शर्ट आहे. त्यावर कशाचेही डाग नाही त्याला **एम.ओ.०६** देण्यात आला. आता आकाशी रंगाचा पांढ–या चौकटी असलेला एक शर्ट दाखविण्यात आला तो आरोपी सचिन याने घातलेला शर्ट होता तो आता मला दाखविण्यात आला. त्यावर कशाचेही डाग नाही त्याला **एम.ओ.०७** देण्यात आला. आता मला फिक्कट पांढरा व त्यावर पांढ–या रेषा असलेला एक शर्ट दाखविण्यात आला तो आरोपी रामा मेंघरे याने घातलेला शर्ट होता तो आता मला दाखविण्यात आला. त्यावर कशाचेही डाग नाही त्याला **एम.ओ.०८** देण्यात आला. आता फिक्कट आकाशी रंगाचा चौकटी असलेला एक शर्ट दाखविण्यात आला तो आरोपी लोभा मेघरे याने घातलेला शर्ट होता तो आता मला दाखविण्यात आला. त्यावर कशाचेही डाग नाही त्याला **एम.ओ.०९** देण्यात आला. आता आकाशी रंगाचा एक शर्ट दाखविण्यात आला तो आरोपी देवराव मेघरे याने घातलेला शर्ट होता तो आता मला दाखविण्यात आला. त्यावर कशाचेही डाग नाही त्याला **एम.ओ.१०** देण्यात आला.

**<u>सरतपास संपला.</u>**

<u>आरोपीतर्फे ॲड. श्री.ए.बी.पोंगळे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>

**५.** माझ्या पतिचे नाव देविदास मेघरे असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पति व आरोपी शंकर हे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी ग्रामपंचायत पिपरा येथील सरपंच होते. माझा सरपंच पदाचा कार्यकाळ हा सन २०१२ पासून ते २०१६ पर्यंत होता. माझ्या पतिला अंबादास रामदास मेघरे नावाचा दुसरा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या पुर्वेला ग्रामपंचायत रोड आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोड हा आरोपीच्या शेतशिवारात जाणारा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पतिने सदर रोडवर अतिरिक्त बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सदर रस्त्यावर बांधकाम केल्यामुळे आरोपी व इतर गावातील लोकांनी आमच्याविरूध्द ग्रामपंचायतकडे तक्रार अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोड हा माझ्या घराच्या तिनही बाजुने आहे. हे म्हणणे खरे आहे की, बांधकाम केल्यामुळे सदर रस्त्यावर बैलबंडी कलवता येत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर बांधकामावरून दि.०६/०७/२०१८ रोजी गावातील लोकांनी ग्रामपंचायतकडे तक्रार अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्जावरून ग्रामपंचायत सदस्य,सचिव हे दि.०६/०७/२०१८ रोजी चौकशीकामी घटनास्थळावर आले होते. साक्षीदार स्वत:हून सांगते की, दि.२७/०८/२०१८ ला आले होते.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, दि.०६/०७/२०१८ रोजी ग्रामपंचायत सदस्य,सचिव घटनास्थळावर आल्यावर आम्ही त्यांना मोक्का चौकशी करू दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की,त्यानंतर दि.२४/०५/२०१८ रोजी सदर बांधकामावरून गावक–यांनी ग्रामपंचायतकडे मोक्का चौकशीकामी दुसरा अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की,मोक्का चौकशी ही दि.२८/०७/२०१८ रोजी झाली होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, दि.२७/०७/२०१८ रोजी झाली होती. हे मला माहित नाही की, मोक्का चौकशी करण्यापुर्वी ग्रामपंचायतने बेला पो.स्टे.कडे पोलिसांची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोक्का चौकशी सुरू झाली त्यावेळी पोलिस घटनास्थळावर हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोक्का चौकशीमध्ये मी व माझ्या पतिने ग्रामपंचायतच्या हद्दीमधील रोडवर बांधकाम केल्याचे निष्पन्न झाले होते.

**७.** हे म्हणणे खरे नाही की, मोक्का चौकशीदरम्यान पाउस चालु होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोडच्या दोन्ही बाजुने नाल्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोक्का चौकशीवेळी गावातील इतर लोक हजर होते. सदर मौक्का चौकशीकामी गावातील दोनशे लोक

हजर होते. हे म्हणणे खरे नाही की,ज्यावेळी ग्रामपंचायत सदस्य,सचिव यांनी सदर रोडवरील अतिक्रमण काढून टाकण्यास माझ्या पतिला सांगितले त्यावेळी माझे पति चिडले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे पति हे आरोपी शंकर मेघरे याच्या अंगावर धावुन गेले होते. हे म्हणणे खरे नाही की,माझे पति आरोपी शंकर मेघरे यांच्या अंगावर धावुन गेले त्यावेळी माझ्या पतिचा नालित पाय गेला व ते पडले त्यामुळे त्यांना मार लागला. साक्षीदार स्वत:हून सांगते की, आरोपी शंकर मेघरे यानेच माझ्या पतिला मारहाण केली.

८. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझा पति व मुलगा यांच्याविरूध्द बेला पो.स्टे.ला तक्रार दिली होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतिने ग्रामपंचायतविरूध्द उमरेड न्यायालयात केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ग्रामपंचायत रोडवर केलेले बांधकाम हटविण्यासाठी ग्रामपंचायने आम्हाला नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस ग्रामपंचायतने दिल्यावरून मी न्यायालयात दावा दाखल केला आहे व तो न्यायालयात प्रलंबित आहे.

९. हे मला माहित नाही की, माझ्या गावामध्ये दोन राजकिय गट आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी लोक वेगळ्या गटाचे आहे व आम्ही वेगळ्या गटाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की,सदर घटनेच्या पुर्वीपासुनच आरोपींसोबत आमचे पटत नाही. आरोपींसोबत सन २०१८ पासुन आमचे पटत नाही.

१०. मी पोलिसांना बयाण दिले होते. मी पोलिसांना बयाण देतेवेळी 'रामा मेघरे यांच्या घरातुन काड्या काढल्या, तसेच लोभा मेघरे याने माझ्या पतिला लोखंडी सळाख व काडीने मारले, तसेच यानंतर पोलिस ठाणेदार साहेब मोक्यावर आले' इ.मजकूर सांगितला होता. आता मला माझे बयाण व फिर्याद दाखविण्यात आले त्यामध्ये सदर मजकूर नमुद नाही. तो का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की,मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीच घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की,मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे आरोपींनी आम्हाला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की,एम.०६ ते १० वरिल कपडे आरोपींचे नाही. हे म्हणणे खरे नाही की,आमचे व आरोपींचे राजकिय वैर असल्यामुळे मी खोटी फिर्याद आरोपीविरूध्द दाखल केली. एम.ओ.०३ ते १० वरिल कपड्यासारखे कपडे बाजारात मिळतात. साक्षीदार स्वत:हून सांगते की, आपण सगळे विकत घेतलेलेच कपडे घालतो. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.०१ सारख्या काठ्या ह्या

शेतामध्ये असतात तसेच एस.ओ.०२ सारख्या सळाखी ह्या बांधकामासाठी वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२०/०९/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड